महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: २२६१/२९२७/२१ दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:**- विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/ अथवा अनुभवावर आधारित चाळणी परीक्षेच्या निकालाबाबत.

**संदर्भ:**-जाहिरात क्रमांक- १५/२०२० व १६/२०२०,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित संगणक प्रणालीवर आधारित खालील चाळणी परीक्षांचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | जाहिरात दिनांक | संवर्ग | परीक्षा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ०१५/२०२० | ११ ऑगस्ट,२०२० | वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट-अ, (श्रेणी-२) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, आदिवासी विकास विभाग | १ डिसेंबर,२०२२ |
| २ | ०१६/२०२० | ११ ऑगस्ट,२०२० | अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-क | १ डिसेंबर,२०२२ |

२. दिनांक ०५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित करण्यात आली आहेत.

३. दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार आयोगाने प्रसिध्द केलेल्या दिनांक १७ जून, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक विकल्पाच्या अनुषंगाने आयोगाच्या अन्य परीक्षांसदर्भात उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत दोन्ही जाहिरातीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांचा निकाल राखीव ठेवण्यात आला आहे.

४. प्रस्तुत निकालानुसार प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता तपासल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. जाहिरातीमधील तरतुदीनुसार विविध दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत पदांची जाहिरात दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली असल्याने दिनांक ०४ मे, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/ प्र. क्र. १२३ / कार्या -२, मधील खुला महिला प्रवर्ग आरक्षणाकरीता नॉन क्रीमीलेअर (NCL) प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची तरतुद दोन्ही पदांकरीता लागु करण्यात आलेली नाही.

६. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

उपसचिव
परीक्षा राजपत्रित
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- नवी मुंबई